**NAGPUR CITY POLICE COMMISSIONERATE**

नागपूर शहर पोलीस आयुक्तालय

**(पोलीस वार्तापत्र)**

(सायंकाळ)

**दिनांक २६.०६.२०२६ शुक्रवार**

**''जागतिक अंमली पदार्थ विरोधी दिन'' निमीत्त, ऑपरेशन थंडर अंतर्गत वेगवेगळ्या पोलीस ठाणे हद्दीत जप्त अंमली पदार्थ मुद्देमालाचा नाश :—**

मा. श्री. रविन्द्रकुमार सिंगल पोलीस आयुक्त नागपूर शहर यांचे संकल्पनेतुन **''ऑपरेशन थंडर — एकत्र येवुया, नशामुक्त समाज घडवुया''** मोहीमेअंतर्गत नागपुर शहर पोलीस दलामार्फतीने वेगवेगळे सामाजिक कार्यक्रम, अंमली पदार्थ विरोधी कारवाई व ऑपरेशन राबविले जात आहेत. **२६ जुन २०२६** हा दिवस जगभरात **''जागतीक अंमली पदार्थ विरोधी दिवस''** म्हणुन साजरा करण्यात येत असुन, त्यानिमीत्ताने मा. पोलीस आयुक्त नागपूर शहर हे **दिनांक १९.०६.२०२६ ते दिनांक २६.०६.२०२६ रोजी दरम्यान** संपुर्ण नागपुर शहरात **''अंमली पदार्थ विरोधी जनजागृती सप्ताह''** राबवित होते.

'अंमली पदार्थ विरोधी जनजागृती सप्ताह' चे अंती आज दिनांक २६.०६.२०२६ रोजी महाराष्ट्र प्रदुषण नियंत्रन महामंडळ यांनी अधिकृत केलेली कंपनी 'महाराष्ट्र ईन्व्हायरो लिमीटेड, एमआयडीसी एरीया, बुट्टीबोरी' येथे नागपुर शहर पोलीस दलातील विविध पोलीस ठाणे अंतर्गत एकुण १२० गुन्ह्यातील जप्त करण्यात आलेले अंमली पदार्थ, ज्यामध्ये एम.डी. (मेफेड्रॉन ड्रग्स), गांजा, चरस, डोडा पावडर असा एकुण वजनी ४८४ किलो नार्कोटीक्स ड्रग्स अंमली पदार्थ एकुण किंमती २,१९,११,६५३/—रू. किंमतीचा मुद्देमाल **एमपिसिबि नॉर्म्स ॲण्ड गाईडलाईन्स प्रमाणे** ड्रग्स डिस्पोझल कमिटीच्या उपस्थितीत नाश करण्यात आला. कार्यवाही दरम्यान कॉलेज व शाळेचे युवा व विद्यार्थी वर्ग यांना प्रत्यक्ष मुद्देमाल नाश कार्यवाही दाखवुन अंमली पदार्थ मानवी जिवनास किती हानीकारक आहे हे दाखवुन मार्गदर्शन करण्यात आले.

मुद्देमाल नाश कार्यवाही मा. श्री. राजेंद्र दाभाडे, अपर पोलीस आयुक्त (गुन्हे), नागपुर शहर, मा. श्री. दीपक अग्रवाल, पोलीस उप आयुक्त (डिटेक्शन), मा. श्री राहुल माकणीकर, पोलीस उप आयुक्त (मुख्यालय) नागपुर शहर, राज्य गुन्हे अन्वेषण विभाग, नागपुर चे पोलीस उपअधीक्षक मा. श्री. महादेव भारसाकडे व मपोनि. श्रीमती शुभांगी मोहाडे, महाराष्ट्र एन्व्हॉयरो कंपनीचे अधिकृत अधिकारी श्री. प्रशांत म्हस्के, सुरक्षा अधिकारी श्री रेवनाथ ठाकरे, तसेच गुन्हेशाखा अंमली पदार्थ विरोधी पथकाचे पोनि. गजानन गुल्हाने व त्यांचे पथकाचे उपस्थितीत अंमली पदार्थ मुद्देमाल नाश कार्यवाही करण्यात आल





**(कामगिरी)**

**पाचपावली पोलीसांची कामगिरी :— घरफोडी करणाऱ्या आरोपींना अटक. ०२ गुन्हे उघडकीस.**

दिनांक १५.०६.२०२६ चे ०८.०० वा. ते दिनांक १८.०६.२०२६ चे ११.०० वा. चे दरम्यान, पोलीस ठाणे पाचपावली हद्दीत लष्करीबाग, लाईन क्र. ८, घसीयारीपुरा, नागपूर येथे राहणारे फिर्यादीचे भाऊ प्रकाश गुप्ता हे आपले राहते घराला कुलुप लावुन परिवारासह खाटुशाम, राजस्थान येथे देवदर्शनाकरीता गेले असता, कोणीतरी अज्ञात चोरट्याने फिर्यादीचे भावाचे राहते घराचे मुख्य दाराचे कुलूप व कडी—कोंडा तोडुन, आंत प्रवेश करून, बेडरूममधील लाकडी आलमारीतील रोख १,५०,०००/—रू. तसेच, सोन्या—चांदीचे वेगवेगळे दागिने असा एकुण किंमती १,८३,५००/—रू. चा मुद्देमाल चोरून नेला. फिर्यादी अनिल हिरालाल गुप्ता वय ४९ वर्ष रा. प्लॉट नं. ३४८, सवर्ण नगर, गुरुनानक फार्मसी कॉलेजचे बाजुला, कपीलनगर, नागपुर यांनी दिलेल्या तक्रारीवरून पोलीस ठाणे पाचपावली येथे अज्ञात आरोपींविरूध्द कलम ३०५(अ),३३१(३),३३१(४) भा.न्या.सं. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला होता.

गुन्हयाचे तपासादरम्यान, पाचपावली पोलीसांचे तपास पथकातील अधिकारी व अंमलदार यांनी, तांत्रिक तपास करुन तसेच मिळालेल्या खात्रीशीर माहितीवरुन, आरोपी १) यश उर्फ बाबा संजय बन्सोड वय २५ वर्ष रा. बंटी चौरेच्या घरी किरायाने, जरीपटका, नागपूर व २) अंशुल उर्फ अनुप देवाजी वाकडे वय २० वर्ष रा. लष्करीबाग, घसियारीपुरा, गली क्र. ८, गुल्लु गुप्ता किराणा दुकानाजवळ, पाचपावली, यांना ताब्यात घेऊन विचारपुस केली असता, त्यांनी वर नमुद गुन्हा संगनमताने केल्याचे कबुल केले. आरोपींना अधिक विचारपुस केली असता, आरोपी क्र. २ याने मागील दहा महिन्यापुर्वी लष्करीबाग येथे श्री. वरवरे यांचे घरी चोरी केल्याची कबुली दिली. गुन्हे अभिलेख तपासला असता, घरफोडीचा गुन्हा नोंद असल्याचे निदर्शनास आले. आरोपीतांचे ताब्यातुन रोख १,९०,५००/—रू., सोन्याची लगड, सोन्या—चांदीचे वेगवेगळे दागिने, ॲपल कंपनीचा लॅपटॉप, आणि पोको कंपनीचा मोबाईल असा एकूण किंमती ६३,९९,४२०/— रुपयांचा मुद्येमाल जप्त करण्यात आला आहे. आरोपींकडून ०२ घरफोडीचे गुन्हे उघडकीस आणलेले आहेत. आरोपींना अटक करण्यात आली आहे. पुढील तपास सुरु आहे.

वरील कामगिरी मा. श्री. रविन्द्रकुमार सिंगल, पोलीस आयुक्त नागपूर शहर, मा. श्री. नविनचंद्र रेड्डी सह. पोलीस आयुक्त नागपूर शहर, मा. श्रीमती विनीता साहू, अपर पोलीस आयुक्त (उत्तर प्रभाग) नागपूर शहर, मा. श्री. राहुल मदने, पोलीस उप आयुक्त (परि.क्र. ३), मा. श्री. शिवप्रसाद पारवे, सहा. पोलीस आयुक्त (लकडगंज विभाग) यांचे मार्गदर्शानाखाली, वपोनि. अनिरुध्द पुरी, दुपोनि. विवेक पडघान, पोउपनि. रंजीत माजगावकर, पोहवा. दिलीप पवार, प्रकाश पखाल, वासुदेव जयपुरकर, अंकुश राठोड, पोअं. आशिष बावणकर, अतुल फरताडे, पद्माकर उके, मपोहवा. हर्षलता गजभिये, मपोअं. प्रिती थोरात यांनी परिमंडळीय सायबर विभागाचे पोअं. महेंद्र सेलोकार यांचे विशेष सहकार्याने केली.



## (गुन्हे)

**१) पोलीस ठाणे हिंगणा :— जुगार खेळणाऱ्या आरोपींविरूध्द गुन्हा दाखल.**

दिनांक २६.०६.२०२६ चे ०१.३० वा. चे सुमारास, पोलीस ठाणे हिंगणा येथील तपास पथकातील अधिकारी व अंमलदार यांना खात्रीशीर माहिती मिळाली की, पोलीस ठाणे हद्दीत कान्होलीबारा गावाकडून गोंडवाना गावाकडे जाणारे रोड लगतचे रेवती ले—आऊटमधील मोकळया जागी काही इसम ताशपत्त्यांवर पैशांची बाजी लावून हार—जीतचा जुगार खेळत आहेत. अशा प्राप्त माहितीवरुन घटनास्थळी पंचासमक्ष रेड कारवाई केली असता, त्याठिकाणी आरोपी क्र. १) निखिल यशवंत मन्ने वय २५ वर्षे रा. वार्ड क्र. १, कान्होलीबारा २) शुभम सुधाकर सहारे वय २७ वर्षे, वार्ड क्र. ५, कान्होलीबारा ३) सुरज रेवंथ दुधबडे वय २९ वर्षे वार्ड क्र. २, कान्होलीबारा ४) मुन्ना गोविंद वाघमारे वय ३० वर्षे, वार्ड क्र. ५, कान्होलीबारा ५) रोशन दामोधर दुधबडे वय ३९ वर्षे, वार्ड क्र. १, कान्होलीबारा ६) वैभव सुधारक सहारे वय २४ वर्षे, वार्ड क्र. ५, कान्होलीबारा हे ताशपत्यावर पैश्यांची बाजी लावुन हार—जीतचा जुगार खेळतांना समक्ष मिळुन आले. घटनास्थळी अंधार असल्याने काही इसम अंधाराचा फायदा घेऊन पळून गेले. ताब्यातील ईसमांना पळुन गेलेल्या ईसमांची नावे विचारली असता, त्यांनी १) होंडा एसपी १२५ मोटार सायकल क्र. एमएच ४० बीजी ४८२० चा मालक आशिष जुनघरे, २) होंडा शाईन मोटार सायकल क्र. एमएच ४० बीए ५७५९ चा मालक सचिन गोहणे, ३) हिरो स्प्लेंडर मोटार सायकल क्र. एमएच ४० सीयु १६२४ तसेच, एचएफ डिलक्स मोटार सायकल क्र. एमएच ४० सीएफ ४८१३ चा मालक दिनेश हजारे असे असल्याचे सांगीतले. आरोपींचे ताब्यातुन डावावरील रोख १७,८००/— रु. ५२ ताश पत्ते, ०७ वेगवेगळया कंपनीचे मोबाईल, ०९ दुचाकी वाहने व इतर साहित्य असा एकुण ७,५९,८२५/— रू. चा मुद्देमाल जप्त करण्यात आला. आरोपींविरूध्द पोलीस ठाणे हिंगणा येथे कलम १२ महा. जुगार प्रतिबंधक अधिनियम अन्वये गुन्हा दाखल करण्यात आलेला आहे. पाहीजे आरोपींचा शोध व पुढील तपास सुरू आहे.

**२) पोलीस ठाणे इमामवाडा :— घातक शस्त्र बाळगणाऱ्या इसमास अटक.**

दिनांक २५.०६.२०२६ चे २१.१० वा. चे सुमारास, इमामवाडा पोलीसांचे पथक हे पोलीस ठाणे हद्दीत पेट्रोलींग करीत असता, त्यांना खात्रीशीर माहीती मिळाली की, पोलीस ठाणे हद्दीत गिरी कॉलनी रोड, टिबी वार्ड क्वॉर्टरचे वॉल कंपाऊडजवळ, ईमामवाडा येथे काळया रंगाचा टिशर्ट व काळया रंगाचा लोअर पॅन्ट घातलेला इसम हा लोखंडी कोयत्या सारखे शस्त्र बाळगून आहे. अशा सुचनेवरून तेथे गेले असता, मिळालेल्या वर्णनाचा इसम दिसून आला. त्यास हटकले असता, तो पोलीसांना पाहुन पळु लागला. त्यास पाठलाग करून ताब्यात घेतले व पंचासमक्ष त्यास त्याचे नाव पत्ता विचारले असता, त्याने त्याचे नाव पियुष उर्फ भांजा राजु शाहू वय २२ वर्षे रा. सम्यक बुध्द विहार जवळ, जाटतरोडी, इमामवाडा, नागपूर असे सांगीतले. आरोपीचे ताब्यातुन एक लोखंडी कोयता किंमती १००/— रू. चा जप्त करण्यात आला.

आरोपी हा दखलपात्र गुन्हा करण्याचे उद्देशाने कोयता बाळगुन समक्ष मिळुन आल्याने व त्याने मनाई आदेशाचे उल्लंघन केल्याने, पोलीस ठाणे इमामवाडा येथे आरोपीविरूध्द कलम ४,२५ भा.ह.का., सहकलम १३५ म.पो.का. अन्वये गुन्हा दाखल करून, आरोपीस अटक केली आहे. पुढील तपास सुरू आहे.

## (मिसिंग)

**पोलीस ठाणे यशोधरानगर :—** कु. अनुष्का विनोद मेश्राम वय १८ वर्षे रा. रानी दुर्गावती नगर, गोंड मोहल्ला, यशोधरानगर, नागपूर ही दिनांक २३.०६.२०२६ रोजी पासुन घरगुती वाद झाल्याने रागाचे भरात पोलीस ठाणे यशोधरानगर हद्दीतील राहते घरी कोणाला काहीही न सांगता कुठेतरी निघुन गेली. घरी परत आली नाही.

शोध घेतला असता मिळून आली नाही. **वर्णन** रंग—सावळा, चेहरा—गोल, बांधा—मजबुत, उंची— ५ फुट १ इंच, केस— काळे व लांब, अंगात—लाल टिशर्ट व निळा जिन्सपॅन्ट घातलेला आहे. भाषा— मराठी/हिंदी बोलते.



कु. अनुष्का

**स्वा/—**
**( अंकुश राठोड )**
**पोलीस उपनिरीक्षक,**
**पोलीस जनसंपर्क अधिकारी,**
**नागपुर शहर.**